# India's Role In SAARC:

## India's Neighborhood Policy



PROF. DR. CHANDRAKANT BANSHIDHAR BHANGE
DR. V M SUNEELA SHYAM
DR. KRISHNA SINGH
MR. DEVIDAS VIJAY BHOSALE

# India's Role in SAARC: India's neighborhood Policy

Late Ramesh Warpudkar Arts College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Edited By**

***Prof. Dr. Chandrakant Bansidhar Bhange***
Professor and Head
Dept. of Military Science, Shri Shivaji College, Parbhani.

***Dr. V M Suneela Shyam***
Assistant Professor in Dept. of Economics, Ethiraj College
for Womens, Chennai.

***Dr. Krishna Singh***
Assistant Professor and Head in Dept. of Political Science,
Government Arts and Commerce Naveen College, Bhopal.

***Mr. Devidas Vijay Bhosale***
Assistant Professor and Head
Dept. of Defence and Strategic Studies, Tuljaram
Chaturchand College, Baramati.

**BIG BOOK DISTRIBUTOR**
bigbookdistributor@gmail.com
B-507, Saya Zions, Greater Noida west
(U.P.- 201305)
8178465057,8700124880

© All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the copyright holder.

| | | |
|---|---|---|
| **Editor** | : | **Prof. Dr. Chandrakant Bansidar Bhange,**<br>**Dr. V M Suneela Shyam,**<br>**Dr. Krishna Singh,**<br>**Mr. Devidas Vijay Bhosle.** |
| **Publisher** | : | **Big Book Distributor**<br>B-507, Saya Zions, Greater Noida west (U.P.-201305) |
| **Phone** | : | +91-8178465057, 8700124880 |
| **E-mail** | : | bigbookdistributor@gmail.com |
| **Book** | : | **India's Role in SAARC: India's Neighborhood Policy** |
| **Edition** | : | November 2022 |
| **ISBN** | : | 978-81-959679-1-9 |
| **Price** | : | **₹499** |
| **Printed By** | : | Swaranjali Offset Printers |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

## CONTENTS

Particulars ................................................. Page No.

1. India and SAARC Countries ................................................. 1

2. SAARC: A Study on India's Strategy Towards Regionalism, Conflicts and Challenges ................................................. 7

3. Role of India in The Development of SAARC ................................................. 14

4. SAARC in Present World Scenario ................................................. 24

5. South Asian Association for Regional Cooperation and Members Countries ................................................. 32

6. Crisis Induce in Sri Lanka: Historical Study ................................................. 40

7. A Common Framework on Research ................................................. 45

8. सार्क में भारत की भूमिका वर्तमान संदर्भ में ................................................. 52

9. दक्षिण एशियाई क्षेत्रीय सहयोग संगठन (सार्क) और भारत ................................................. 57

10. समकालीन विश्व में दक्षिण एशिया का बदलता परिदृश्य, (भारत के संदर्भ में) ................................................. 67

11. सार्क संघटनेची दहशतवादा विषयीची भूमिका : एक दृष्टीक्षेप ................................................. 78

12. सार्क संघटनेत भारताची भूमिका ................................................. 87

13. सार्क आणि राजकीय प्रश्न ................................................. 93

14. दक्षिण आशियाई सहकार्य संघटना (SAARC) ................................................. 99

15. सार्क: यश व अपयश ................................................. 106

16. दक्षिण आशिया संदर्भात महाशक्तींची भूमिका ................................................. 110

17. भारतीय सागरी सुरक्षा ................................................. 123

18. सार्क सदस्य राष्ट्रातील व्यापारात होणा-या चढ-उताराची कारणे: एक दृष्टिक्षेप ................................................. 127

## 12

# सार्क संघटनेत भारताची भूमिका

प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही.

राज्यशास्त्र विभाग, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय

सोनपेठ जि.परभणी

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना:**

दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना(The Sauth Asian Association for Regional Co-Operétion) अर्थात सार्क (SAARC) या संघटनेची स्थापना ८ डिसेंबर १९८५ रोजी करण्यात आली. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान या सात देशांनी एकत्रित येऊन या संघटनेची स्थापना केली आहे. या संघटनेचे मुख्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे असून, या संघटनेची राजभाषा इंग्रजी ही आहे. एप्रिल २००७ च्या चौदाव्या शिखर संमेलनात अफगाणिस्थान या देशाला आठवा सदस्य म्हणून मान्यता देण्यात आली आहे. यामुळे आता सार्कचे एकूण आठ सदस्य राष्ट्रे आहेत.

सन १९७० च्या दशकात बांगलादेशाचे तत्कालीन राष्ट्रपती जिया उर रहमान यांनी दक्षिण आशियाई राष्ट्रांचा एक व्यापारी गट तयार करण्यात यावा अशी संकल्पना मांडली. पुढे मे १९८० मध्ये पुन्हा हाच विचार पुढे आला. एप्रिल १९८१ मध्ये सात देशांचे विदेश सचिव कोलंबो येथे एकत्रित आले. तेव्हा त्यांनी पाच मुद्द्यांवर एकत्रित येत एक क्षेत्रीय संघटना स्थापन करण्याचे ठरविले. आपापसातील मतभेद दूर करून आपसात सहयोग वाढवणे. यावर या देशांमध्ये एकमत झाले.

दक्षिण आशियाई सदस्य देशांच्या लोकसंख्येचा विचार केला तर सन २०१५ च्या जनगणनेनुसार १ अब्ज ७१ कोटी ३ लाख ८ हजार, ७० येवढी लोकसंख्या या देशांची आहे. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशांचे हे संघटन आहे असे म्हणता येईल. पण आर्थिक दृष्ट्या या देशातील लोक गरिबी, बेकारी, उपासमार, निरक्षरता, अनारोग्य आदी समस्यांनी पीडित आहेत. आजही या देशातील लोक या समस्यांचा सामना करताना दिसतात. या देशांमध्ये काही बाबतीत समानता आढळते.ती म्हणजे मालदिव सोडता उर्वरित सर्व देश भारतीय उपमहाद्वीपाचे भाग आहेत. त्यामुळे यांच्यात ऐतिहासिक,

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

भौगोलिक, धार्मिक आणि सांस्कृतिक बाबतीत एकता आहे. भारताच्या फाळणीच्या आधी पाकिस्तान व बांगलादेश भारताचे अविभाज्य भाग होते.

सन १९८३ मध्ये या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची पहिली बैठक भारताची राजधानी दिल्ली येथे पार पडली. यात दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहयोग करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. त्यानंतर दुसरी बैठक १९८४ मध्ये मालदिवची राजधानी माले येथे आणि तिसरी बैठक १९८५ मध्ये भूतान येथे झाली. आणि शेवटी ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क या संघटनेची स्थापना करण्यात आली. कृषी, आरोग्य, मौसम, विज्ञान, डाक व तारसेवा, ग्रामीण विकास, विज्ञान तंत्रज्ञान, दूरसंचार, खेळ व सांस्कृतिक सहकार्य इत्यादी क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर यात भर देण्यात आला. याशिवाय दहशतवाद, मादक पदार्थ तस्करी, मानवी हक्क व महिला विकास यासारख्या समस्या निर्मूलनासाठी क्षेत्रीय सहकार्य करण्याचे सुद्धा ठरवण्यात आले आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

1. सार्क संघटनेची स्थापना व रचना,कार्य अभ्यासणे.

2. सार्क संघटनेतील भारताच्या भूमिकेचा अभ्यास करणे .

**शोध निबंधाची गृहितके:**

प्रस्तुत शोध निबंधाचे निष्कर्ष पुढील गृहीतकांच्या आधारे काढण्यात आले आहेत.

1. सार्क संघटना एक प्रादेशिक संघटना आहे.

2. सार्क संघटनेत सध्या भारताची भूमिका निष्क्रिय आहे.

3. सार्क संघटना स्थापना व रचना :- सार्क संघटनेची स्थापना आणि सार्क संघटनेची रचना यासंबंधीची माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

**ढाका घोषणापत्र किंवा सार्क चार्टर**

सार्क संघटनेचे उद्देश, सिद्धांत, संस्था आणि आर्थिक किंवा वित्तीय व्यवस्था यासंबंधीच्या विधिवत तरतुदी ढाका घोषणापत्रात करण्यात आलेल्या आहेत. या घोषणापत्रात एकूण दहा तरतुदी (कलम )आहेत. यांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**सार्कचे उद्देश:** सार्क संघटनेची स्थापना ज्या उद्देशाच्या आधारे करण्यात आली आहे. ते मुख्य उद्देश

चार्टरच्या कलम ( १) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

1. दक्षिण आशियाई क्षेत्रातील जनतेचे कल्याण करून त्यांचा जीवनस्तर उंचावणे.

2. दक्षिण आशियाई देशांमध्ये सामूहिक आत्मनिर्भरता आणून त्यात वृद्धी करणे.

3. आपापसात विश्वास, विचारांची देवाणघेवाण करून समस्यांचे मूल्यांकन करणे.

4. आशियाई क्षेत्रात आर्थिक, सामाजिक तथा सांस्कृतिक विकास करणे.

5. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात सक्रिय सहकार्य व सहाय्यता यात

वृद्धी करणे.

6. अन्य विकसनशील देशांबरोबर सहकार्य वाढविणे.

7. समान हिताबाबत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपापसातील सहकार्य मजबूत करणे.

**सार्कचे सिद्धांत:** सार्क संघटनेची स्थापना ज्या सिद्धांतावर करण्यात आली आहे ते सिद्धांत कलम (२)

मध्ये दर्शविले आहेत.

1. संघटने अंतर्गत सहयोग, समानता, क्षेत्रीय अखंडता, राजनैतिक स्वातंत्र्य, अंतर्गत कारभारात अहस्तक्षेप

आणि समान हितसंबंधाच्या सिद्धांताचा सन्मान करणे.

2. अशा प्रकारच्या सहयोग द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सहयोगाचे स्थान घेणार नाही. त्याला ते पूरक असेल.

3. हे संघटन द्विपक्षीय सहयोग आणि बहुपक्षीय उत्तरदायित्वाचा विरोध करणार नाही.

**सार्कची रचना:** सार्क संघटने अंतर्गत पुढील संस्थांच्या आधारे रचना करण्यात आली आहे.

1. **शिखर संमेलन:** घोषणापत्राच्या कलम (३) नुसार प्रतिवर्षी एक शिखर संमेलन आयोजित करण्यात

येईल.यात सदस्य देशांचे राष्ट्रप्रमुख भाग घेतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

2. **मंत्रिपरिषद:** घोषणापत्राच्या कलम (४) नुसार सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची एक परिषद

असेल.आवश्यकतेनुसार यांची कधीही बैठक घेण्यात येईल. परंतु सहा महिन्याच्या आत एक बैठक होणे

आवश्यक आहे. ही मंत्रिपरिषद संघटनेचे ध्येय, धोरण ठरविणे, सामान्य हिताच्या मुद्द्यांवर निर्णय घेणे

आणि सहकार्याचे नवीन क्षेत्र शोधणे अशी कार्य करेल.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**3. स्थायी समिती:** कलम (५) नुसार सदस्य देशांच्या सचिवांची एक स्थायी समिती असेल. या समितीची बैठक आवश्यकतेनुसार कधीही घेण्यात येईल.तसेच एका वर्षात एक बैठक घेणे अनिवार्य आहे. सदरील समिती सहकार्याचे कार्यक्रम,अंतर्गत क्षेत्रीय प्राथमिकता आणि सहकार्याचे नवीन क्षेत्रांची निवड करणे या बाबतीतील कार्य करेल.

**4. तांत्रिक समिती:** कलम( ६) मध्ये सार्क संघटनेच्या तांत्रिक समितीची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सदस्य देशांचे प्रतिनिधी सदस्य असतात. सदरील समिती आपल्या क्षेत्रात कार्यक्रमांचे आयोजन करणे, समन्वय निर्माण करणे, कार्यक्रमांचे मॉनिटरिंग करणे आणि स्वीकृत क्षेत्रात सहयोग निर्माण करून नवीन संभावनांचा शोध घेणेही कार्य ही समिती करेल.

**5. कार्यकारी समिती:** कलम( ७) मध्ये या समितीची तरतूद करण्यात आली आहे. या समितीची स्थापना स्थायी समितीकडून करण्यात येईल.

**6. सचिवालय:** या कलम(८) मध्ये सार्क संघटनेच्या सचिवालय यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. सचिवालयाची स्थापना दुसऱ्या शिखर संमेलनात करण्यात आली. १६ जानेवारी १९८७ रोजी बेंगलोर येथे याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आणि १७ जानेवारी १९८७ पासून सचिवालयाचे कार्य सुरू झाले. सार्क सचिवालयात एक महासचिव हे पद असेल. याचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. प्रत्येक सदस्य देशाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती हे पद ग्रहण करील. सार्क सचिवालयाचे सात भागात विभाजन केले आहे प्रत्येक विभागाला एक अध्यक्ष असेल.

**7. वित्तीय तरतुदी:** सार्क संघटनेचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक सदस्य देशांने आर्थिक स्वरूपात अंशदान करणे आवश्यक आहे. तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार हे अंशदान असेल.सदस्य देशाचे अंशदान पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात आले आहे. भारत ३२%, पाकिस्तान २५% ,नेपाळ, बांग्लादेश व श्रीलंका ११ % आणि भूतान व मालदीव प्रत्येकी ०५% अंशदान करतील.

**भारताची भूमिका:**

सार्क संघटनेत सध्या एकुण आठ देश सहभागी आहेत.यात भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, मालदीव आणि अफगाणिस्तान यांचा समावेश होतो.यामध्ये भारत हा सर्वात मोठा देश आहे.त्यामुळे सार्क संघटनेत भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

सार्क संघटनेला स्थापन होऊन आज जवळपास पस्तीस वर्षे पूर्ण झाली आहेत.या पस्तीस वर्षातील सार्क संघटनेची वाटचाल निश्चितच समाधानकारक राहीली नाही.सार्कने स्वीकारलेली बहुतांश उद्दीष्टे ही केवळ कागदावरच राहिली आहेत.जगातील इतर प्रादेशिक संघटनांशी तुलना करता सार्क संघटनेतील

सदस्य राष्ट्रांत ऐक्य व परस्पर विश्वास यांची कमतरता राहिली आहे.याशिवाय भारत पाकिस्तान यांच्यातील राजकीय संघर्षामुळे सार्कच्या ध्येय धोरणात सातत्य राहिले नाही.सन २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व सार्क संघटनेतील सदस्य देशांच्या प्रमुखांना शपथविधी समारंभाला बोलाविले होते.यामुळे सार्क संघटनेला गती येईल असे वाटले परंतु नंतरच्या काळात सार्क संघटना केवळ नावालाच उरलेली दिसत आहे.

सार्क संघटनेतील सर्व सदस्य देशांचा विचार करता गरिबी, बेकारी, दहशतवाद, धार्मिक मुलतत्ववाद, निरक्षरता, अनारोग्य, लोकसंख्या वाढ, राजकीय अस्थिरता हे प्रश्न सारखे आहेत.येवढेच नाही तर सर्व सदस्य राष्ट्रांची सांस्कृतिक ठेवण सारखीच आहे.

भारत सोडून इतर सर्व सार्क सदस्य देशांत आज राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे.श्रीलंकेत सध्या (२०२२) सर्व सामान्य लोकांनी तेथील सरकारच्या विरोधात उठाव केला आहे.तर अफगाणिस्तानात तालिबानी राजवट(२०२१) स्थापन झाली आहे.तर पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांचे सरकार जाऊन शाहबाझ शरीफ.(२०२१) यांचे सरकार स्थापन झाले आहे.यासर्व परिस्थितीत भारताची भूमिका म्हणावी तशी दखलपात्र राहिली नाही.बिग ब्रदर या नात्याने भारताने सार्क संघटनेतील सर्व सदस्य राष्ट्रांमध्ये ऐक्य निर्माण करणे आवश्यक आहे.

सार्क संघटनेचे आतापर्यंत एकूण ३२ शिखर संमेलने झाली. यामध्ये वेगवेगळे ठराव घेण्यात आले. दहशतवाद संबंधित ठराव, दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्र ठराव(SAFTA), १९९३ चा गरिबी निर्मूलन ठराव, रोड रेल आणि पावर कनेक्टिव्हिटी संबंधीचा ठराव,सार्क कोविड १९ ईमरजेंशी फंड, खुल्या सीमा यासारख्ये विविध ठराव घेऊन सार्क संघटनेने परस्पर सहकार्य वाढवण्यासंबंधी पावले उचलली; परंतु त्यात म्हणावी तशी प्रगती झाली नाही. अन्नसुरक्षा, पर्यावरण ,नैसर्गिक आपत्ती, आरोग्य आधी बाबतीमध्ये जी प्रगती व्हायला पाहिजे ती झालेली दिसून येत नाही. याउलट सार्क संघटनेतील सदस्य राष्ट्रांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणाने मतभेद निर्माण होत आहेत.

**समारोप:**

सार्क संघटनेत भारताची भूमिका या प्रस्तुत शोधनिबंधाचा आढावा घेता असे दिसून येते की, सार्क संघटना ही केवळ नावाला उरलेली संघटना आहे. जगातील इतर प्रादेशिक संघटना उदा. ASEAN, OPEC, Commonwealth, Utopian Union, आफ्रिकन संघ यांचा विचार करता सार्क संघटनेमध्ये एकवाक्यता दिसून येते नाही.

तसेच सार्क संघटनेतील भारत -पाकिस्तान यांच्यातील विविवाद हा सर्वात मोठा अडसर ठरत आहे. इतर राष्ट्रांमध्ये चांगले संबंध आहेत, पण ज्या पद्धतीचे हे संबंध असणे अपेक्षित आहेत तसे ते नाहीत. सार्क संघटनेतील सर्व सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक देवाण-घेवाण केवळ ५% आहे. तसेच सार्क संघटनेत रोड रेल व विजा कनेक्टिव्हिटी नाही.

याशिवाय सार्क देशांमध्ये भारताची भूमिका ही काही प्रमाणात कमकुवत राहिली आहे. सध्या श्रीलंका, अफगाणिस्तान, नेपाळ, पाकिस्तान या देशांमध्ये आर्थिक व राजकीय स्थैर्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अशा वेळी भारताने पुढाकार घेऊन या देशांना आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर चीन या संधीचा फायदा घेऊ शकतो. त्यामुळे सार्कचे संघटन मजबूत होण्याऐवजी ते दुबळे होऊ शकते.

**संदर्भ सूची:**


1. आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ.शैलेंद्र देवळाणकर
2. आंतरराष्ट्रीय संबंध तथा राजनीती -जे.सी.जोहरी
3. https://www.weaklysadhana.in
4. Mea.gov.in
5. www.bbc.com
6. www.maharashtratimes.com


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani